**ग्रामीण कृषी मौसम सेवा**

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 13-07-2021**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये हिंगणा ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2021-07-13 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2021-07-14 | 2021-07-15 | 2021-07-16 | 2021-07-17 | 2021-07-18 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 2.8 | 6.5 | 2.8 | 1.3 | 4.5 |
| कमाल तापमान (अं.से) | 34.5 | 34.1 | 34.5 | 35.3 | 35.8 |
| किमान तापमान (अं.से) | 24.7 | 24.0 | 25.1 | 25.4 | 25.7 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 86 | 83 | 79 | 76 | 78 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 73 | 76 | 72 | 71 | 70 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 13.0 | 12.0 | 11.0 | 11.0 | 11.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 108 | 130 | 113 | 175 | 198 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 6 | 4 | 5 | 4 | 6 |

## हवामान सारांश / चेतावणी:

हिंगणा तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकानिहाय मूल्य वर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक १४ जुलै २०२१ ते १८ जुलै २०२१ दरम्यान आकाश आंशिक ते पूर्णतः ढगाळ राहण्याची आणि अति हलक्या ते हलक्या स्वरूपाचा पाऊस आणि १४ जुलै २०२१ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

शेतकरी बांधवांनी शेतात काम करत असताना मेघगर्जनेचा आवाज आल्यास तत्काळ सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी भाजीपाला, फळबागा आणि इतर पिकामध्ये पाणी साचून राहणार नाही यासाठी याची दक्षता घ्यावी. पावसाच्या अतिरिक पाण्याचा निचरा करावा. मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने जनावरांना बाहेर चरावयास सोडणे टाळावे. उर्वरित पेरणी पडलेला पाऊस व पुढील पावसाचा अंदाज लक्षात घेऊन वाफसा आल्यानंतर उरकून घ्यावी. कृषी रसायनांची फवारणी, उभ्या पिकात खते देण्याची कामे

## संक्षिप्त संदेश सल्ला:

कृषी रसायनांची फवारणी, उभ्या पिकात खते देण्याची कामे पाऊसाच्या उघडीप नंतर जमिनीमध्ये वाफसा आल्यानंतर करावीत.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सोयाबीन | वेळेवर पेरणी केलेल्या सोयाबीन पिकामध्ये पावसाची उघडीप पाहून आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी) वाफसा आल्यानंतर करावी. खोड माशी किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यानंतर थायमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन 9.5 % |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | झेडसी २.५ मिली किंवा इथिऑन ५० टक्के ईसी १५ मिली किंवा क्लोरअँट्रानिलीप्रोल 18.5 % एससी २ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाच्या उघाडीचा दिवस बघून वाफसा आल्यानंतर फवारणी करावी. पांढऱ्या माशीच्या प्रौढ पतंग अवस्थेतील किडीच्या निरीक्षणासाठी २० ते २५ पिवळे चिकट संपले लावावेत. |
| मुग | मुग पिकाची सलग पीक म्हणून पेरणी टाळावी. |
| उडीद | उडीद पिकाची सलग पीक म्हणून पेरणी टाळावी. |
| तूर | वेळेवर पेरणी केलेल्या तूर पिकामध्ये पावसाची उघडीप पाहून आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी) वाफसा आल्यानंतर करावी. |
| कपाशी | फवारणी ची कामे पाऊसाची उघडीप नंतर जमिनीमध्ये वाफसा आल्यानंतर कोरडा दिवस पाहून करावीत. कपाशीमध्ये शंखी/गोगलगाय च्या व्यवस्थापनासाठी शेतातील धुरे/बंधारे तन आणि इतर कुजलेल्या अवशेषापासून मुक्त ठेवावे. प्रादुर्भाव जास्त असल्यास ज्या ठिकाणी प्रादुर्भाव असेल त्या ठिकाणी (स्पॉट एप्लिकेशन) क्लोरपायरीफॉस २० ईसी २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून द्यावे. |
| सिट्रस | झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. आवश्यकता भासलास आधी खोदलेल्या चरांद्वारे अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. झाडावरील पानसोट काढून टाकावेत. हिरवळीच्या खताच्या उपलब्धतेसाठी धेंचा किंवा ताग ४० किलो प्रती हेक्टर बियाणे या प्रमाणात पेरणी करावी. |
| सिट्रस | फवारणी ची कामे पाऊसाची उघडीप नंतर जमिनीमध्ये वाफसा आल्यानंतर कोरडा दिवस पाहून करावीत. संत्रा वर्गीय फळ बागमध्ये फायटोप्थोरा ब्राऊन रॉट रोगाचा व्यवस्थापनासाठी मेफेनोक्झाम एम झेड- ६८ (मेटालीक्सील ४ % + मान्कोझेब ६४ %) २.५० ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| तांदूळ | मित्र किडींच्या संवर्धनासाठी धान बांधावर झेंडू व चवळी पिकाची लागवड करावी.रोपवाटीका:- खोडकिडा व गादमाशीच्या व्यवस्थापनाकरिता कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५ किलो ग्रॅम प्रति हेक्टर (कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५० ग्रॅम प्रति १०० वर्ग मीटर रोपवाटीका) रोपकाढणीच्या ५ दिवस अगोदर रोपवाटीकेत टाकावे. धान रोपवाटीका तण विरहीत ठेवावी.रोपांचे शेंडे तोडून बांबूच्या टोपलीत जमा करावी त्यामुळे रोपांच्या शेड्यांवर असणारी खोडकीडींची अंडी नष्ट होवून त्यामधून परोपजिवी किटकसूद्धा बाहेर पडतील. गादमाशी प्रवण क्षेत्रामध्ये धानावरील गादमाशीचा प्रादुर्भाव कमी करण्याकरिता रोवणी २० जुलै पर्यंत करावी. तुड्तुड्यांच्या व्यवस्थापनाकरिता रोपांची पट्टा पद्धतीने लागवड करावी. (१० ओळी किंवा २ मीटर नंतर ३० सेमी. जागा मोकळी सोडावी) |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. |
| गाय | पावसापासून संरक्षण करण्यासाठी जनावरांच्या गोठयाचे छप्पर दुरुस्त करून घ्यावे. जनावरे पावसात फार काळ भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| वनस्पती संरक्षण | तननाशकाची खरेदी आणि फवारणी करताना लेबल नीट वाचून घ्यावे. फवारणीकरिता स्वच्छ पाणी वापरावे तसेच कडक उन्हात उगवण पश्चात फवारणी टाळावी. तन नाशकाचा वापर काळजीपूर्वक करावा. फवारणी पूर्वी फवारणी पंप स्वच्छ धुवून घ्यावा. ढगाळ हवामान असतांना फवारणी करू नये. शिफारशीत नसलेली भिन्न तननाशके एक मेकांत मिसळू नये. तननाशकाची फवारणी पूर्वी जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री करावी. |

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | शेतकरी बांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्ही शेतात काम करीत असाल तर शेताजवळील सुरक्षित ठिकाणी ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षित ठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडा पालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवून तळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीला स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणी किंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे. जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावर आश्रय घ्यावा. |
| सामान्य सल्ला | शेतकरी बांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: विजांच्या बचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेच जनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासून शक्यतो दूर राहावे. शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी. शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोन व्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडी असलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासून बनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |